आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

बुधवार, दिनांक १३ मार्च २०२४

ठळक बातम्या

1. पीएम- सूरज योजनेमुळे वंचित समाजात निश्चित सकारात्मक बदल घडतील- आज पीएम-सूरज योजनेच्या उदघाटनाच्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.
2. आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय; राज्याच्या आरोग्य विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेतले जाणार तर आशा सेविकांच्या मानधनात ५००० रुपयांची वाढ.
3. सहा वर्षाच्या खंडानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय प्रतिनिधींची सभा नागपूर इथं दिनांक १५, १६ आणि १७ मार्च रोजी आयोजित.
4. रणजी क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात आज चौथ्या दिवशी विदर्भाच्या पाच बाद २४८ धावा.

*****

पीएम-सुरज

'पीएम-सूरज पोर्टलच्या माध्यमातून वंचित समुदायाला आर्थिक सहायय दिलं जात आहे. दुसऱ्या योजनांप्रमाणेच या योजनेचा लाभ नागरिकांच्या थेट बँक खात्यात जमा होईल. पीएम-सुरज योजनेमुळे वंचित समाजात निश्चित सकारात्मक बदल घडतील' असं प्रतिपादन आज पीएम- सूरज योजनेच्या उदघाटनावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. पीएम-सुरज अर्थात प्रधानमंत्री-सामाजिक उत्थान आणि रोजगार आधारीत जनकल्याण या महत्वाकांक्षी योजनेत चंद्रपूर जिल्ह्याचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेचा प्रारंभ आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृष्यप्रणालीद्वारे करण्यात आला. चंद्रपुरात वन अकादमी इथं झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, सांस्कृतिक कार्य मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासह जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची उपस्थिती होती. देशाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित

असलेल्या अनुसूचित जाती, इतर मागासवर्ग आणि सफाई कर्मचाऱ्यांच्या पाल्यांकरीता शिक्षणाच्या प्रभावी सुविधा, शिष्यवृत्ती तसेच सिमांत वर्गाचे शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक सशक्तीकरण आणि अल्प व्याजदरात कर्जाद्वारे आर्थिक सहाय्यता आदी प्रयोजनार्थ राष्ट्रव्यापी स्तरावर **525** जिल्ह्यात ही सामाजिक सशक्तीकरण योजना राबविण्यात येत असून महाराष्ट्रातील **9** जिल्ह्यांचा या योजनेत प्रारंभिक स्तरावर समावेश करण्यात आला आहे.

राज्य मंत्रिमंडळ बैठक

आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत  काही महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. मुख्यमंत्री कनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली हि बैठक घेण्यात आली. यामध्ये मराठवाड्यातील जालना आणि बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव यांना जोडणारा नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्ग आणि त्यासाठी  २४५३ कोटी राज्याच्या हिश्यास मान्यता देण्यात आली आहे. तसंच हजारो कर्मचाऱ्यांना लाभ देत राष्ट्रीय आरोग्य विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत घेतलं जाणार आहे. यामध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्यातील कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी 10 वर्ष व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना आरोग्य सेवेतील मंजूर समकक्ष पदांवर सामावून घेण्यात येईल. या निर्णयानुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी 10 वर्ष व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी वयाची अट शिथिल करण्यात येणार आहे. आशा स्वयंसेविकांच्या मानधनात पाच हजार रुपये तर पोलीस पाटलांच्या मानधनात भरीव वाढ करून त्यांना आता दरमहा १५ हजार रुपये दिले जाणार आहेत. राज्यात सध्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये कार्यरत 297 कंत्राटी शिल्पनिदेशकांचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागात सामावून घेण्यास मंत्रिमंडळ मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये मनुष्यबळाची कमतरता भरुन निघण्यास मदत होणार आहे. आज झालेल्या अन्य महत्वाच्या निर्णयात  मराठी भाषा धोरण, शुभमंगल सामूहिक विवाह योजनेसाठी २५ हजार रुपये अनुदान, शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी वीज वितरण प्रणाली सक्षमीकरण योजनेच्या ११ हजार ५८५ कोटींच्या प्रकल्पास मान्यता आदी निर्णय घेण्यात आले आहेत. मुख्यमंत्री ग्राम

सडक योजनेत २३ हजार किलोमीटर रस्ते बांधण्याचा निर्णय झाला असून दार वर्षी दहा हजार किलो मीटरचे रस्ते बांधण्याच उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे.

जिल्हा नाव बदल

अहमदनगर या शहराचं नाव बदलून 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी नगर' आणि पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्याचं  नाव 'राजगड' करण्यास आज राज्य मंत्रिमंडाळानं मान्यता दिली आहे. 'पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करणारा, त्यांचे विचार, कार्य, स्मृती पुढे घेऊन जाणारा, लोकप्रतिनिधींना चांगले कार्य करण्यासाठी प्रेरणा देणारा हा निर्णय आहे. यासाठी  समस्त महाराष्ट्रवासियांचे मी मनापासून अभिनंदन करतो', अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अहमदनगर शहराच्या नामांतराच्या  निर्णयाचं  स्वागत केलं असून, मुख्यमंत्री तसच राज्य मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांचे आभार मानले आहेत.

त्रिपक्षीय सामंजस्य करार

देशभरात परवडणाऱ्या आणि सुलभ डिजिटल सेवांचा प्रसार करण्यासाठी दूरसंचार विभागांतर्गत सार्वत्रिक सेवा दायित्व निधी नं प्रसार भारती आणि डिजिटल कॉमर्ससाठी मुक्त नेटवर्क सोबत त्रिपक्षीय सामंजस्य करार केला आहे. भारतनेट पायाभूत सुविधांवर चालणाऱ्या ग्रामीण भारतासाठी ओटीटी आणि ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मसह ब्रॉडबँड सेवा एकत्रित करणे, हा या सामंजस्य कराराचा उद्देश आहे. देशभरातील ग्रामपंचायती आणि गावांमध्ये हायस्पीड ब्रॉडबँड आणि मोबाइल कनेक्शन सक्षम करण्यात युएसओएफ ची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. या सामंजस्य करारामुळे समूह प्रसार भारती ओटीटी सेवा म्हणून सक्षम करेल, ज्यामध्ये रेखीय चॅनेल, लाइव्ह टीव्ही आणि मागणीनुसार सामग्री समाविष्ट आहे, तर यूएसओएफ ग्रामीण आणि दुर्गम भागात कार्यक्षम आणि उच्च-गती ब्रॉडबँड सेवा सुनिश्चित करेल.

भारत जोडो न्याय यात्रा

कांग्रेसची सत्ता येताच पहिला निर्णय महिला आरक्षण लागू करण्याचा होईल, तसच सरकारी नोकऱ्यामध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण देवून प्रत्येक संस्थांमध्ये

महिलांची भागिदारी दुप्पट केली जाणार, अशा विविध घोषणा आज कॉग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांनी धुळ्यात आयोजित महिला हक्क परिषदेत केल्या. भारत जोडो न्याय यात्रेच्या निमित्ताने आज १३ मार्च रोजी राहुल गांधी यांनी धुळे शहरात रोड शो आणि महिला हक्क परिषद घेतली. लोकांशी संवाद साधत कॉंग्रसला पाठबळ देण्याचं आवाहन केलं. सत्तेत येताच जाती निहाय जनगणना करण्याची घोषणा देखील राहुल गांधींनी या सभेत केली.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

तब्बल सहा वर्षाच्या खंडानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय प्रतिनिधींची सभा नागपूर येथील डॉ. केशव हेगडेवार स्मारक स्मृती मंदिर रेशीम बाग इथं येत्या 15,16 आणि 17 मार्च रोजी होणार असल्याची माहिती संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी आज नागपूरमध्ये पत्रकार परिषदेत दिली. ही बैठक या आधी 2018 साली झाली होती. यावर्षी देशभरातून 1529 कार्यकर्ते या बैठकीला उपस्थित राहतील. या अखिल भारतीय प्रतिनिधी बैठकीतून संघकार्याची समीक्षा होते तसेच देशभरातील संघकार्याचे कार्यवृत्त देखील या बैठकीत ठेवले जाते. संघाला 2025 मध्ये 100 वर्ष पूर्ण होतील. सध्याच्या 68 हजार संघ शाखा एक लाख पर्यंत नेण्याचा संकल्प देखील या बैठकीत करणार असल्याचं आंबेकर यांनी यावेळी स्पष्ट केलं.

आयुष्मान भारत

बुलढाणा जिल्ह्यातील रुग्णांना केंद्र शासनाच्या आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेचा लाभ चांगल्या प्रकारे होत असून यामध्ये प्रथमच खुबारोपण शस्त्रक्रिया जिल्हयात यशस्वीपणे पार पडली असून, या योजनेचा लाभार्थींना फार मोठा दिलासा मिळाला आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना प्रति कुटुंब प्रति वर्ष रु. ५ लक्ष पर्यंत मोफत उपचार असून १२०९ प्रकारच्या वैद्यकीय उपचार पद्धती आणि शस्रक्रिया अंगीकृत रुग्णालयात मोफत केल्या जातात. आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे बुलढाणा जिल्हयात सुमारे १८ लक्ष लाभार्थी असून त्या पैकी ३८ टक्के लाभार्थ्यांनी आयुष्मान कार्ड योजनेचा लाभ घेतला आहे.

या योजनेचा लाभ घेण्याचं आवाहन  जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांनी केलं आहे-

*सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की याच्यामध्ये जास्तीत जास्त स्वतःची आणि आपल्या कुटुंबीयांची नोंदणी करून पाच लाख रुपये पर्यंतचे वार्षिक आपले विमा कव्हरेज घ्यावा आणि मोफत उपचाराची संधीचा लाभ घ्यावा. ग्रामीण भागातील ज्यांना कोणाकडे मोबाईल जर का नसेल नोंदणी करायला जरा अडचण येत असेल, तर याकरिता आपले सेतू सेवा केंद्र आहे, आपले सरकार सेवा केंद्र आहे, आशाताई आहेत अंगणवाडी सेविका आहेत, शिक्षक आहेत किंवा आपल्या घरातील अन्य जी व्यक्ती मोबाईलचा पुरेसं ज्ञान आहे.  ती देखील आपल्याला याच्यामध्ये सहाय्य करू शकते विशिष्ट बचत गटांना आणि शिक्षकांना या याच्या संदर्भातच विशेष माझा आव्हान राहणार आहे, की प्रत्येक घरापर्यंत ही योजना विद्यार्थी आणि आपल्या बचत गटाच्या सदस्यांच्या माध्यमातून प्रत्येक गावागावांमध्ये पोचवण्याची कळकळीची जिल्हा प्रशासनाचे वतीने मी आवाहन करीत आहे.*

रणजी करंडक

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत मुंबईत वानखेडे स्टेडिअमवर सुरु असलेल्या अंतिम सामन्यात आज चौथ्या दिवशी विदर्भाच्या दुसऱ्या डावात ५ बाद २४८ धावा झाल्या आहेत.  जिंकण्यासाठी त्यांना आणखी २९० धावांची गरज आहे. काल मुंबई संघानं विदर्भापुढे ५३८ धावांचं  लक्ष  ठेवलं  होतं.  आज  करून  नायर  याने  ७४ धावा  काढल्या. तर दिवसा  अखेर अक्षय वाडकर याच्या ५६ धावा झाल्या आहेत.

*****